श्रीसंत गाडगेबाबा यांचे जन्मस्थळ शेंडगांव, ता. अंजनागाव सूर्जी जि. अमरावती या तीर्थक्षेत्राच्या विकास आराखडयांतील कामास निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः तिर्थवि २०१९/प्र.क्र.११८/योजना-६
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ
फोर्ट, मुंबई ४०० ००१
दिनांक : ३१ जुलै, २०१९.

वाचा :- शासन निर्णय क्रमांकः तिर्थवि-२०१८/प्र.क्र.२०९/योजना-६ग्राम विकास विभाग,

दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९.

प्रस्तावना :-

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये श्रीसंत गाडगेबाबा यांचे जन्मस्थळ , शेंडगांव, ता. अंजनगाव सूर्जी जि. अमरावती या तीर्थक्षेत्राच्या **रु.१८६३.३६** लक्ष (**रुपये अठरा कोटी त्रेसष्ट लाख छत्तीस हजार फक्त**) इतक्या रकमेच्या विकास आराखडयास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच, प्रशासकीय मान्यतेसोबतच सदर तीर्थक्षेत्रास रु.७४५.०० लाख (रुपये सात कोटी पंचेचाळीस लाख फक्त) इतका निधी जिल्हाधिकारी, अमरावती यांना वितरीत करण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णयात नमूद केले होते. तथापि, सन २०१८-१९ या वर्षामध्ये निधी उपलब्ध न झाल्याने सदर तीर्थक्षेत्रास निधी उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. सबब, सदर तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी करावयाच्या विकास कामांना प्रथम टप्प्यात मंजूर रकमेच्या २०% च्या मर्यादेत निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत राज्यातील ग्रामीण तीर्थक्षेत्रांना निधी वितरीत करण्यासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात एकूण रु.९०००.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. सदर अर्थसंकल्पीत निधीतून श्रीसंत गाडगेबाबा यांचे जन्मस्थळ , शेंडगांव, ता. अंजनागाव सूर्जी जि. अमरावती येथे करावयाच्या विकास कामांकरीता प्रथम टप्प्यात रु.३७३.०० लक्ष (रुपये तीन कोटी त्र्याहत्तर लक्ष फक्त) इतका निधी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या अधिनस्त ठेवण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी, अमरावती यांनी प्रशासकीय मंजुरी आदेशात समाविष्ट कामांपैकी, एक किंवा जास्त कामांवर सदर निधी खर्च करण्यास हरकत नाही.

३. सदर निधी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेला वितरीत करतांना व प्रत्यक्ष खर्च करतांना उपरोक्त संदर्भाधिन येथील शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व शर्ती लागू राहतील.

४. उपरोक्त कामांवरील खर्च मागणी क्र.एल-०३ "२५१५-इतर ग्रामविकास कार्यक्रम-१९६, जिल्हापरिषदांना / जिल्हास्तरीय पंचायतीना सहाय्य-(००)(०७) ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांच्या विकासाकरीता रु.२.०० ते २५.०० कोटीपर्यंत अनुदान (२५१५२५२१) (योजनांतर्गत) दत्तमत ३१-सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

५. सदर वितरण सुधारित मासिक विवरणपत्राच्या मर्यादेत आहे.

६. सदर निधी वितरीत करतांना वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ.- २, दि. १ एप्रिल, २०१९ च्या परिपत्रकामधील अटी व शर्तीचे पालन करण्यात आले आहे.

७. सदर शासन निर्णय वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ.- २, दि. १ एप्रिल, २०१९ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१९०८०९११३१११९०२०** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANOJ DATTATARY JADHAV

Digitally signed by MANOJ DATTATARY JADHAV
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=a83fc829949e9b1a022b031436c946028b48d51f5a1bf36ca3ce4fead857da72, postalCode=400001, street=BHANDHKAM BHAVAN,25 MARZBAN PATH,FORT,MUMBAI, serialNumber=2766afda86350272237dcf9a191545970f7f12e66d0605c664ca2bf0f3001dc0, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=MANOJ DATTATARY JADHAV
Date: 2019.08.29 15:38:26 +05'30'

(मनोज जाधव)

उप सचिव , महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई

२. मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.राज्यमंत्री (ग्रा.वि.).यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२ नागपूर
६. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२ नागपूर
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान सचिव (बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
११. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मंबई
१२. विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती.
१३. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती
१५. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद , अमरावती
१६. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अमरावती
१७. जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती
१८. नियोजन विभाग (का.१४७४/१४४४) मंत्रालय, मुंबई-३२.
१९. वित्त विभाग (व्यय -१५, अर्थसंकल्प-१६/१७), मंत्रालय, मुंबई ३२.
२०. कक्ष अधिकारी, कार्यासन क्र.वित्त-७, वित्त-१, वित्त-८, ग्राम विकास विभाग
२१. निवड नस्ती (का.यो-६). ग्राम विकास विभाग